## नियमित दिवाणी दावा क्र.८१/२००८ मधील निशाणी क्र.४६ वरील आदेश
**(CNR NO. MHRG14-000426-2008)**

१. सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी, त्यांचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' आदेश रद्द करणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर वादीतर्फे म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, सदरकामी प्रतिवादींचे वकील हजर होते. त्यामुळे प्रतिवादी हजर नसल्यामुळे उलटतपास घेतला नाही ही सबब योग्य नाहीत. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे. तसेच त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, जर नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने सदरचा अर्ज मंजूर करावा असे न्यायालयाचे मत झाल्यास प्रतिंवादीवर खर्च बसवावा.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे प्रकरण दिनांक २५.०७.२०२२ रोजी वादीचा साक्षीदार क्र. १ धनंजय कृष्णा पाटील यांचे सरतपास व उलटतपासाकरीता नेमलेले होते. सदर दिवशी सदर साक्षीदाराचा सरतपास घेण्यात आला. परंतु प्रतिवादी हजर नसल्यामुळे प्रतिवादींचे वकीलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे सदर दिवशी प्रतिवादींविरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश न्यायालयाने पारीत केलेला आहे.

तरी, कायदयानुसार कोणत्याही प्रकरणाचा गुणदोषावर निकाल करण्याकरीता सर्व पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' आदेश रद्द करणे योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २. | प्रतिवादी यांचेविरुध्द दिनांक २५.०७.२०२२ रोजी झालेला 'उलटतपास नाही' हा आदेश रक्कम रु.५००/– इतक्या खर्चासह रद्द करणेत येत आहे. |
| ३. | प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना पुढील तारखेपर्यंत दयावी अन्यथा सदरचा अर्ज प्रतिवादी यांचे उलटतपासाशिवाय निकाली करणेत येईल. |
| ४. | प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर, वादीचा साक्षीदार क्र. १ धनंजय कृष्णा पाटील यांना उलटतपासाकरीता पुन्हा बोलाविण्यात यावे. |

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2022.10.18 11:06:25 +0530

ठिकाण – उरण
दिनांक – १७/१०/२०२२

(निलेश म. वाली)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.